आपले जग
# भारत विकास
जानेवारी २०१२
भारत विकास परिषद वार्ता - महाराष्ट्र प्रांत II






## गुरूवार १२ जनवरी २०१२ को

## भारत विकास परिषद के १२ लक्ष युवा पूरे देश में बनाऐंगे 'मानव-श्रृंखला'

भारत विकास भवन में रविवार २० नवम्बर २०११ को राष्ट्रीय आयोजन समिति की प्रथम बैठक संपन्न हुई। इसमें राष्ट्रीय अध्यक्ष श्री.आर.पी.शर्मा, राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष श्री.आय.डी.ओझा, राष्ट्रीय महामंत्री श्री.एस.के.वधवा, राष्ट्रीय वित्तमंत्री श्री.के.एल.गुप्ता, राष्ट्रीय संगठन मंत्री श्री.हरीश जिंदल, राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री.वीरेंद्र सभरवाल, श्री.एस.एस.अस्थाना, श्री.एस.पी.तिवारी, राष्ट्रीय प्रकाशन प्रभारी श्री.सुरेश चंद्रा, राष्ट्रीय संयोजक श्री.वीरेंद्र याज्ञनिक, राष्ट्रीय समन्वयकर्ता श्री.सुनील गर्ग , श्री.मधुकर गिरमे (महाराष्ट्र) तथा आयोजन समिति के सदस्यगण उपस्थित थे। घने कोहरे एवं यातायात व्यवस्था में अवरोध के बावजूद देश के अधिकतर प्रांतीय प्रभारियों ने बैठक में हिस्सा लिया।

राष्ट्रीय अध्यक्ष श्री.आर.पी.शर्मा ने, न केवल भारत विकास परिषद सदस्य परिवारों को, अपितु समाज के अधिक से अधिक व्यक्तियों को इन समारोह से जोडने की बात दोहरायी व १२ जनवरी को एक बहुत बडी देशव्यापी मानव-श्रृंखला (ह्युमन चेन) बनाने का आवाहन किया। राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री.एस.पी.तिवारी ने १८ महिनों तक चलनेवाले इन कार्यक्रमों में युवा वर्ग को साथ जोडने की बात कही जिससे परिवार हित, समाज हित व राष्ट्रहित होते हुए आत्मविश्वास जगेगा तथा एक स्वस्थ व सशक्त भारत स्वत: ही बन जाएगा।

उन्होंने स्वामी विवेकानंदजी के जीवन पर आधारित निबंध व भाषण प्रतियोगिताओं के आयोजन पर भी बल दिया।

राष्ट्रीय प्रकाशन प्रभारी श्री.सुरेश चंद्रा ने इस दौरान स्वर्ण जयंती व विवेकानंद जयंती पर साहित्य प्रकाशन, कॅलेंडर, डायरी, पॉकेट-डायरी बनाने की जानकारी प्रस्तुत की जिससे कि यह सत्र विवेकानंदमय हो सके।

बैठक का संचालन राष्ट्रीय महामंत्री श्री.सुरेंद्र कुमार वधवा ने बखूबी निभाया। राष्ट्रीय संयोजक श्री.वीरेंद्र याज्ञनिक ने सभी उपस्थितजनों को कर्तव्यों का बोध कराते हुए अपने-अपने प्रांत में सभी सदस्यों की उत्सुकता जागृत करने की बात कही। उन्होंने संस्कृति सप्ताह को मास सेंट्रल प्रोग्राम में परिवर्तित करने की बात कही व सभी को भारत विकास परिषद के ५० वर्षों की उपलब्धियों के साथ ही विवेकानंद जयंती को मनाने का आवाहन किया।

इस अवसर पर उन्होंने सभी से नये लोगो का प्रयोग शीघ्रअतिशीघ्र अमल में लाने की बात कही। इसी कडी में संस्था की ओर से फ्लॅगज्, टी-शर्टस्, कॅप्स, डिसप्ले कार्डस, की-रिंग्ज, पेन्स, पेपरवेट, टेबल कॅलेंडर इ. बनवाए जा रहे हैं।

अधिक से अधिक सार्वजनिक स्थानों पर स्वामी विवेकानंद जी की आदमकद प्रतिमा लगवायी जानी चाहिए। उन्होंने बताया की इस अभूतपूर्व एवम् ऐतिहासिक मौके पर एक स्वर्ण जयंती गीत की भी रचना की जा रही है।

इन समारोहों का श्रीगणेश दिल्ली में भारत विकास भवन के प्रांगण में स्वामी विवेकानंद जी की आदमकद प्रतिमा के अनावरण से होगा तथा १५ जनवरी २०१२ को दिल्ली में एक विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित किया जाएगा।

इसके अतिरिक्त सभी प्रभारियों ने अपनी अपनी बात, अपने अपने सुझाव व्यक्त किए व आगामी युगल जयंती कार्यक्रमों को अत्यंत सफलतापूर्वक करने का आश्वासन दिया व प्रण लिया।

***

### पहिले ध्वनिमुद्रण संस्कृत भाषेत

ध्वनिमुद्रण ही संकल्पना आता सर्वसामान्य झाली आहे. चोरून ऐकलेले संभाषणसुद्धा ध्वनिमुद्रित करता येते आणि अवकाशातील ध्वनी आपल्या खिशात मुद्रित करता येतो. एकेकाळी ग्रामोफोनची तबकडी हे श्रीमंत माणसाचे लक्षण समजले जात असे. शंभर वर्षांपूर्वी ज्याच्या घरी ग्रामोफोन आणि रेडिओ असे, असे घर भलतेच रुबाबाचे मानले जाई. हळूहळू ग्रामोफोनची लोकप्रियता खेडोपाडी वाढत गेली आणि त्याच्या तबकड्या लोकांनी उत्साहाच्या भरात संग्रहित केल्या.

ग्रामोफोनचा शोध थॉमस एडिसन या शास्त्रज्ञाने जुलै १८७७ मध्ये म्हणजे सुमारे १३५ वर्षांपूर्वी लावला. त्यावेळी त्यास फोनोग्राफ असे म्हणत असत. फोन किंवा फोनो हा लॅटिन शब्द असून त्याचा अर्थ ध्वनी. एडिसनकडे जॉन क्रुएसी नावाचा मॅकेनिक होता त्याने फोनोग्राफचे प्राथमिक साधन बनविले. त्या यंत्रात प्रथमत: 'मेरी हॅड अ लिटल लॅम्ब' या बालगीताचे स्वर उच्चारले आणि सिलेंडरभोवतीच्या सूक्ष्म खाचेत ते अंकीत झाले. परंतु हा फक्त प्रयोग होता.

बाजारात असे यंत्र विक्रीसाठी आणायचे तर त्याकरिता पहिले ध्वनिमुद्रण जाहीरपणे करावे लागेल असे एडिसनला वाटले. एखाद्या भाषाशास्त्रज्ञाच्या मदतीने हे ध्वनिमुद्रण शुद्ध व स्वच्छ भाषेत केले जावे म्हणून त्याने मॅक्समुलरला विनंती केली. मॅक्समुलरची संस्कृत भाषेतील रुची आजही जगजाहीर आहे. पहिले ध्वनिमुद्रण त्या काळातील प्रतिष्ठित लोकांसमोर एचएमव्ही याच कंपनीतर्फे होणार होते.

सर्व तयारी केल्यानंतर मॅक्समुलरने ऋग्वेदातील पहिला श्लोक म्हटला तो असा होता - *अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् होतारं रत्नधातमम्* ।। आम्ही अग्नीदेवाची उपासना करतो आणि होता(आहुती) देणारे आहोत. यजमान देवस्वरूपात असल्याने (त्यांना) रत्नांनी विभूषित करणारे आहोत.

याप्रकारे पहिल्या फोनोग्राफवर पहिले ध्वनिमुद्रण झाले.

**संपादकाच्या लेखणीतून...**

*नमस्कार,*

*२०१२ या नवीन वर्षातला पहिला व भाविप वार्ताचा हा पंचवीसावा अंक. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांच्या वृत्तांनी यापुढचे अंक भरभरून वाहतील अशी अपेक्षा ठेवूया. प्रत्येक सरते वर्ष हे नवीन आकांक्षांची बीजे पेरूनच जात असते. तसे पाहिले तर दररोजच्या सूर्यासारखाच नवीन वर्षाचा सूर्य उगवतो. रोजच्यासारखेच कॅलेंडरचे पान उलटते. नवीन वर्षात नवीन असे काही नसतेच, नवा असतो तो आशावाद. व्यक्तिगत पातळीवर समाजात, देशात दररोज अनेक उलथापालथी होत असतात. या सर्वच घटना आशादायक नसतात. काही टोकाची निराशा देणाऱ्या घटनाही घडत असतात. परंतु मागील सर्व चुकांचे, अपयशांचे, निराशांचे गाठोडे बांधून टाकून द्यायचे व त्यातून मिळालेल्या अनुभवांवरून शहाणे होऊन पुन्हा नव्याने संकल्प करायचे, पुन्हा नव्या उत्साहाने कामाला लागायचे यासाठी आपल्याला काही निमित्त हवे असते. नवीन वर्षाचे कॅलेंडर असे अनेक संकल्प नव्याने करायला प्रेरित करते.*

*यावर्षी तर स्वामी विवेकानंदांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्ताने होणारे कार्यक्रम व त्यानिमित्ताने होणारे स्वामी विवेकानंदांच्या कर्तृत्त्वाचे स्मरण सतत आपल्याला प्रेरित करण्यासाठी आपल्यासोबत असणार आहे. स्वामीजींचे तत्त्वज्ञान म्हणजे मूर्तिमंत तेजाचे भांडार आहे. त्यांच्या आयुष्यात कधीही निराशा, दुबळेपणा यांना त्यांनी थारा दिला नाही. निद्रित, उदासीन समाजाला जागे करणे, त्याला मातृभूमीच्या पुनरुत्थानाच्या दिव्य ध्येयाने भारित करणे व त्यासाठी रचनात्मक विधायक मार्ग दाखवणे हे स्वामीजींनी केलेले कार्य आजही मोठ्या प्रमाणावर सुरू राहण्याची गरज आहे. अनेक छोटेछोटे कृतिशील उपक्रम करून समाजापर्यंत पोचणे व समाजातील सर्व घटकांना प्रत्यक्ष सहभागी करून घेता येईल अशा कार्यक्रमांची आखणी करणे हे यानिमित्ताने करायला हवे. अनेकदा काही प्रतिकात्मक कार्यक्रमही समाजाची मानसिकता बदलण्यास उपयोगी पडतात. बसल्याबसल्या एसएमएस करणे वा नेटवरून सहमती देणे यातही किती प्रचंड ताकद असू शकते हे आपणाला वॉल स्ट्रीट आंदोलनाने दाखवून दिले. आण्णांच्या आंदोलनाबाबतही मतभेद-शंका असल्या तरी चांगल्या गोष्टीसाठी जनमताचा रेटा कसा निर्माण करता येतो व त्याची दखल घेणे कसे भाग पडते हे दिसून आले. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त होणारी अभूतपूर्व मानवी साखळी आपण सर्वजण आपल्या ठिकाणी यशस्वी करून यानिमित्ताने स्वामीजींच्या विचारांचा एक सकारात्मक माहोल देशभर निर्माण करू शकतो. केंद्राकडून सुचविण्यात आलेले सर्व कार्यक्रम या वातावरणनिर्मितीस हातभार लावणारे आहेत. महाराष्ट्र प्रांत २ स्वामीजींच्या विचारांनी भाविपच्या माध्यमातून ढवळून काढण्याचा संकल्प पुन्हा एकदा करूया. नवे वर्ष ,सुवर्णमहोत्सवाचे नवे पर्व, मकरसंक्रांत व प्रजासत्ताक दिन या साऱ्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.*

**– विनिता तेलंग**

**स्वामी विवेकानंद यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त स्वामीजींच्या कार्याचा आढावा घेणारी एक लेखमाला सुरू करत आहोत.**



# प्रज्ञासूर्याचा प्रवास

मकर संक्रमणास भारतीय जीवनात अनन्य महत्त्व आहे. शीतकालाची समाप्ती होऊन ऊर्जेने भरलेल्या पर्वाचा प्रारंभ होण्याचा हा दिवस. तिळातिळाने दिवस मोठा होण्याचा म्हणजेच कर्मप्रधानतेचा काळ वाढवणारा हा मंगलदिन. परंतु या शुभदिनी उदित होणाऱ्या भास्करापूर्वी, आणखी एका दिव्यतेचे अवतरण धरेवर आहे. हजारो वर्षांचा, अज्ञान व दुर्बलतेचा अंधार घालवण्यासाठी आपल्या तेजस्वी विचारधारेने अविरत तळपत राहील असा एक तेजोगोल अवतरला.... बंगालमधील दत्त घराण्यात विश्वनाथ व भुवनेश्वरी या अलौकिक मातापित्यांच्या पोटी सप्ताहाच्या शुभप्रारंभी – सोमवार, १२ जानेवारी १८६३ या दिवशी 'वीरेश्वर' हा पुत्र अवतरला. हेच नरेंद्र व पुढे जगभर प्रसिद्ध झालेले प्रज्ञासूर्य स्वामी विवेकानंद!

स्वामीजी मानवी क्षमतांचा परमोच्च आविष्कार होते. अनुकूलता लाभो वा प्रतिकूलता, स्वामीजींचे व्यक्तित्व सदैव तळपत राहिले. माणूस किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला हे महत्त्वाचे ठरते, हे स्वामीजींचे जीवन पाहता तंतोतंत पटते. अवघे ३९ वर्षांचे आयुष्य! त्यातील फक्त ९ वर्षे सार्वजनिक जीवनात, व त्यातही ५ परदेशात. परंतु केवळ ४ वर्षात त्यांनी संपूर्ण भारतीय समाजजीवन अक्षरशः ढवळून काढले. वेदांताच्या प्राशनाने प्राप्त झालेल्या पुरुषार्थी वृत्तीने त्यांनी पराभूत मानसिकतेच्या गर्तेत लोळणाऱ्या भारतीय जनमानसात प्राण फुंकले. आजही स्वामीजींची प्रतिमा केवळ डोळ्यापुढे आणली तरी मनाचे दैन्य पार नाहीसे होते. आत्मविश्वासाने फुललेल्या छातीवर दोन्ही हातांची घडी घालून उभे असलेले स्वामीजींचे रूप आठवले तरी अक्षुण्ण युवा उर्जेचा साक्षात्कार होतो. त्यांच्या विचारातील ठामपणा, निर्भयता व सत्याचे अधिष्ठान त्यांच्या बाह्य रूपातून परावर्तित होत असते. एका खऱ्या योद्ध्याचे, एका स्वयंभू पूर्णतेचे हे समर्थ व्यक्तित्त्व पाहून अशुभ चळाचळा कापू लागते व सारे शुभंकर प्रकट होते – असे तेजस्वी रूप!

असे हे केवळ ९ वर्षात विश्वविजयाचे धनी होणारे, हे चिरंतन स्फूर्तीदायी जीवन घडले कसे? अनेकानेक विषयांमध्ये त्यांच्या ऋतंभरा प्रज्ञेने संचार कसा केला? मोक्षमुक्तीच्या मार्गावर झपाट्याने पुढे गेलेल्या त्यांच्या योगी वृत्तीत समाजाप्रती अथांग करुणा दाटून येणे व त्या करुणेपोटी संपूर्ण आयुष्य कर्मप्रधानतेने समाजपुरुषाला समर्पित करणे हे जाणून घेणे रोचक ठरेल.

बालपणापासूनच स्वामीजी स्वतःचा मार्ग स्वतंत्रपणे शोधत असत. व्रात्यपणा, अवखळपणा ही बालसुलभ लक्षणे त्यांच्या अंगी होतीच. घरासमोरील उंच झाडावर त्यांनी चढू नये म्हणून त्यांना त्या झाडावर ब्रह्मराक्षस असल्याची भीती घातली गेली. बाल्यावस्थेतही साहसी युवावृत्तीची बीजे अंगी असणारा बाल नरेंद्र मात्र भर दुपारी झाडाच्या फांदीवर बसून ऐटीत सांगत, 'मी पाहतो आहे ब्रह्मराक्षस कुठे आहे तो!' या धैर्यवृत्तीचा संदेश पुढे त्यांनी युवकांना दिला – 'राक्षसा'ची भीती सोडा, म्हणजे आपोआप 'ब्रह्म' हाती लागेल!

अनेकदा टोकाच्या भावनांचे दर्शन त्यांच्या बाल व्यक्तिमत्त्वातही होत असे. काही मनाविरुद्ध घडले की असा महारुद्राचा अवतार प्रकट होई की तो शांत करणे कुणालाच शक्य नसे. अशा वेळी मातेने चक्क थंड पाण्याची धार मस्तकावर सोडावी व 'शिव, शिव, शिव, शांत हो, नाहीतर श्री शिव तुला कैलासात घेणार नाहीत बरं!' असे म्हटल्यावर बाल नरेंद्राची स्वारी शांत होई. दुसऱ्या टोकाला ध्यान धारणेची तयारी व ओढ इतकी की ध्यानस्थ होऊन बसले तर त्यांना शोधणारे लोक दरवाजा मोडून आत आले तरी त्यांचे ध्यान भंगत नसे. खेळताना कायम नेतृत्त्वाचीच भूमिका 'सम्राट' होणे आवडे, तर कुणाला काही देण्याच्या बाबतीत तर कर्णाला लाजवील असे दातृत्त्व बालवयातही त्यांच्या अंगी होते. शाळेच्या शिस्तीत बसणारा स्वभाव नव्हता. पण सतत चुळबूळ करणारा, गप्पा मारणारा हा मुलगा प्रश्न विचारले तर बिनचूक उत्तरे देई. वयाच्या सातव्या वर्षी मुग्धबोध हे संस्कृत व्याकरण तोंडपाठ असणारे हे बालक तीव्र बुद्धी, अफाट ग्रहणशक्ती व असामान्य स्मरणशक्तीचे धनी होते.

स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वात नवता व समृद्ध परंपरा या दोन्हींचा संगम दिसून येतो. दत्त घराणे कलकत्त्यातील प्रतिष्ठित, ख्यातकीर्ती घराणे. स्वामीजींच्या आजोबांपासून कर्तृत्त्ववान पुरुषांनी या घराण्याच्या समृद्धीतही भरच टाकली. त्या वेळच्या कुटुंबपद्धतीनुसार या ऐश्वर्यसंपन्न घराच्या आश्रयाला अनेक नातेवाईक मंडळी आलेली असत. परंपरेपेक्षा नवता, सुखसोयी यांचा विचार वडील विश्वनाथबाबू यांच्या वृत्तीत होता. आई भुवनेश्वरी मात्र परंपरागत संस्कारशील वृत्तीचे पालन करीत. अत्यंत मृदुभावी, प्रेमळ, कर्तव्यदक्ष व नितांत धर्मपरायण अशा त्या होत्या. आपल्या प्राणप्रिय अशा पुत्राचे पालन करताना त्याच्या ठायी त्यांनी नेहमी उत्तमतेचा ध्यास फुलवला. त्याला अस्सल 'माणूस' बनवण्यासाठी त्या प्रयत्नशील राहिल्या. त्या भावुकही होत्या पण प्रसंगी तितक्याच कणखर, खंबीरही होत्या. पुढे अकाली या जगाचा निरोप घेणाऱ्या आपल्या विश्वविजयी पुत्राला क्षत्राणी मातेला साजेशा धैर्याने त्यांनी प्रणाम केला.

अशा दोन स्वतंत्र जीवनधारणांच्या प्रवाहाने स्वामीजींचे जीवन घडले. परंपरा व नवता यांचा सुरेख समन्वय पुढे स्वामीजींनी आपल्या तत्त्वज्ञानातून घडवला. असूया, द्वेष यांचा लेशमात्र स्पर्श नसलेले त्यांचे मन परंपरा व नवता, पौर्वात्य व पाश्चिमात्य, धार्मिकता व विज्ञान, ईश्वराचे अनुसंधान व माणूसपणाचा सन्मान यांचा सहज समन्वय साधू शकले. तरीही त्यात आत्मगौरवाला तिलांजली देण्याची तडजोड कधीच नव्हती. आत्मभानाच्या जाणीवेने पूर्ण सामर्थ्याच्या अविष्करणानंतरच शिवभावे जीवसेवा हे समन्वयाचे पूर्ण विकसित सूत्र प्रकटले.

मातापित्यांनी घडवलेले हे सुघड व्यक्तिमत्त्व पुढे पूज्य श्री रामकृष्ण परमहंसांनी ध्येयसुवर्णाने मढवले. पित्याने

*(पुढे चालू...)*

## 'भारत को जानो' प्रांतस्तरीय स्पर्धा सांगली येथे संपन्न

११ डिसेंबर रोजी सांगली शाखेच्या वतीने 'भारत को जानो' या स्पर्धेची प्रांत स्तरावरील फेरी आयोजित करण्यात आली होती. सांगली येथील विष्णूकृपा मंगल कार्यालय येथे आलेल्या स्पर्धकांची भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. 'महेश नागरी पतसंस्था' यांच्या सुसज्ज हॉलमध्ये मुख्य स्पर्धा झाली. स्पर्धेचे उद्घाटन सांगलीतील एक कल्पक उद्योजक श्री.सुहास कुंटे यांच्या हस्ते झाले. प्रांत संयोजक श्री.अनिल पुंडे, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तयारी सुनियोजितपणे झाल्याने स्पर्धा अत्यंत उत्साही वातावरणात व कोणतीही अडचण न येता पार पडल्या. खास या कार्यक्रमासाठी पुण्याहून केंद्रीय पदाधिकारी श्री.मधुकर गिरमेजी, प्रांत पदाधिकारी श्री.अच्युत दीक्षित, श्री.विनय व सौ.सुनिता खटावकर हे उपस्थित होते. संपूर्ण स्पर्धेचे उत्तम संचालन सौ.मंगलाताई व श्री.माधवराव सवदीकर यांनी केले.

सांगलीची सुकन्या, स्वत: सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त असूनही उच्चशिक्षित व अनेक पुरस्कारांमुळे महाराष्ट्रात सुपरिचित अशा कु.वल्लरी करमरकर हिच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण झाले. वल्लरीने अतिशय नेमके व भावपूर्ण भाषण केले. उत्तम यश प्राप्त करा परंतु भारतमातेला विसरू नका, परदेशी जाण्याची स्वप्ने रंगवू नका असे आवाहन तिने केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सांगली शाखेच्या सर्वच कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सौ.व श्री. वैभव जोशी, सौ.व श्री. नरेंद्र यरगट्टीकर, सौ.व श्री.समीर गाडगीळ, सौ.व श्री. कुलकर्णी, सौ.व श्री. प्रसाद उकीडवे, सौ.व श्री. अजय बोरवणकर, सौ.व श्री. शैलेंद्र तेलंग इ. उपस्थित होते. शाखेतील बालसदस्य स्पर्धा पाहण्यासाठी उत्साहाने उपस्थित होते.

*(मागील पानावरून...)* *विवेकानंद*

नेहमीच वादविवादाचे, विचारविनिमयाचे स्वातंत्र्य देऊन आत्मविश्वास वाढवलेला होताच, श्री गुरुदेवांनी त्यांना आपल्या अलौकिक कार्याचे वाहक म्हणून निवडून त्यांच्या जीवनाला निश्चित प्रयोजन प्राप्त करून दिले.

बाल्यावस्थेतील चाकोरीबद्ध शिक्षणाची वाटचाल फारशी आनंददायी नसली तरी वाढत्या वयातील वाढत्या जिज्ञासेने मात्र त्यांना गप्प बसू दिले नाही. त्याकाळच्या सर्व प्रसिद्ध लेखकांचे साहित्य, जगातील सर्व विचारवंतांचे तत्त्वज्ञान, साहित्य काव्य, इतिहास सारे सारे त्यांनी पुरते आत्मसात केले होते. त्या जोडीला उत्तम शरीरसंपदाही प्रयत्नपूर्वक कमावलेली होती. प्रखर बुद्धिमत्ता, बलदंड शरीरसंपदा, तेजस्वी रूप असे परिपूर्ण व्यक्तिमत्त्व असूनसुद्धा तरुण नरेंद्रनाथांच्या मनात अस्वस्थतेने घर केले होते. या सगळ्या पुस्तकी ज्ञानातून परमसत्याचा शोध लागणार नाही, केवळ विद्वत्तापूर्ण चर्चेने ईश्वर भेटणे शक्य नाही या जाणिवेने त्यांची घालमेल होत होती. अनेक विद्वान अधिकारी पुरुषांकडून निराश झाल्यावर अखेर श्री रामकृष्ण परमहंसांनी त्यांच्या 'तुम्ही ईश्वर पाहिला आहे काय' या व्याकुळ प्रश्नाला 'होय' असे निसंदिग्ध उत्तर दिले व त्यांची तळमळ शांत झाली.

वयाच्या १८ व्या वर्षी स्वामीजींना ठाकुरांचे प्रथम दर्शन घडले व ते २३ वर्षांचे असताना. ठाकूर श्री रामकृष्ण परमहंस समाधिस्थ झाले. १८८६ ते १८९० या चार वर्षात स्वामीजींनी जवळपासचे प्रवास केले. त्यावेळी ते संन्यासी झालेले होते. १८९१ व ९२ साली त्यांनी भारत परिक्रमा केली. याच परिक्रमेच्या अखेरीस ते कन्याकुमारी येथील शिलखंडावर ध्यानस्थ झाले होते. वयाच्या तिसाव्या वर्षी स्वामीजी अमेरिकेत गेले. पुढे १८९६ पर्यंत युरोपीय देशांमध्ये झंझावाती दौरे करून वेदांत तत्वज्ञानाची ध्वजा सर्वत्र रोवली. हिंदुधर्म, हिंदू संस्कृती, हिंदुस्थान याविषयीचे अपसमज सप्रमाण व निर्धारपूर्वक पुसून टाकले. १८९७ ला मायदेशी परतून 'रामकृष्ण मठ व मिशन'ची स्थापना केली. जुलै १८९९ मध्ये दुसऱ्यांदा अमेरिकेत गेले. १९०० च्या अखेरीस यशस्वी युरोप दौरा संपवून कलकत्त्यास परतलेले स्वामीजी ४ जुलै १९०२, महासमाधीपर्यंत तिथेच होते.

वयाच्या तिसाव्या वर्षी स्वामीजींनी सामाजिक जीवनात आपली जीवननौका लोटली. पुढची ९ वर्षे ते सतत ज्ञानप्रसार, संघटन, सेवा या त्रिसूत्रीच्या आधारे लोकयात्रेला वळण देत राहिले. सतत प्रवास, अविश्रांत परिश्रम व भारतीय उत्थानाचा ध्यास या नऊ वर्षांचा 'श्वास' बनून राहिला होता. अशा दिव्य चरित्राचा समग्र धांडोळा घेणे हे कामही मोठे कठीण परंतु त्यांच्या तेजस्वी जीवनप्रवासाच्या धावत्या परिशीलनातही आपल्या हाती लागतो तो प्रखर विचारज्वालेचा पोत! चला, हा पोत हाती घेऊन आपणही भारतमातेच्या दरबारातील सामर्थ्यवान गोंधळी बनूया! स्वामीजी म्हणत होते , ''या खेपेस केंद्र आहे भारतवर्ष! मृताची पूजा टाकून आम्ही तुम्हाला जिवंताच्या पूजेसाठी बोलावत आहोत. उठा! या महान युगचक्राच्या परिवर्तनास हातभार लावा!''

(क्रमश:)

***श्री.विवेक घळसासी लिखित श्री.रामकृष्ण मठ यांचे अधिकृत प्रकाशन असलेल्या 'युवा चेतना : स्वामी विवेकानंद' या पुस्तकावर आधारित...***

## आरोग्य शिबिर - पुणे





दत्त जयंती निमित्त १०/१२/२०११ के दिन भारत विकास परिषद - स्वारगेट, युवा, महिला, मगरपट्टा, दक्षिण पुणे शाखा तथा साई योगी सेवा प्रतिष्ठान की ओर से आरोग्य शिबिर प्रात: १० बजे से सायंकाल ४ बजे तक लगभग २७० दर्दीओंकी ब्लडग्रुप, डायबिटीस, हिमोग्लोबीन की चेकिंग का शिबिर माधवाश्रम में हुआ। कार्यक्रम के अध्यक्ष सेवा प्रमुख खिमजीभाई गाला थे। समाजसेविका कोकिलाबेन शेठ, मधुकर गिरमे, प्रवीण दोशी, विठ्ठल काटे, माधव आश्रम के अध्यक्ष मणीभाई मेहता, बचपन वर्ल्ड के रतन माळी, जनकल्याण रक्तपेढी के डॉ.रमेश कांबळे, डॉ.उदिता शाह, पोपटलालजी सिंगवी, अनिल वखारिया, वासुदेव त्रिवेदी व संयोजक युवा शाखा के भरत जैन (सुराणा) उपस्थित थे। प्रवीण दोशीने मार्गदर्शन किया। डॉ.उदिता शाह ने सबको धन्यवाद दिया।

**- प्रवीण दोशी**

## इचलकरंजी येथे माहेश्वरी महिला मंडळाचे सहकार्याने मोफत जयपूर फूट शिबिर संपन्न

२४ डिसेंबर रोजी इचलकरंजी येथील माहेश्वरी महिला मंडळ व श्री महेश नवयुवक मंडळ यांच्या सहकार्याने भारत विकास परिषद प्रांत II च्या 'विकलांग पुनर्वसन केंद्र' या प्रकल्पांतर्गत मोफत जयपूर फूट शिबिर घेण्यात आले.

सातारा येथे झालेल्या शिबिरापासून प्रेरणा घेऊन या संस्थेने 'विकलांग केंद्र' कार्यकर्त्यांना निमंत्रित केले होते. शिबिरासाठी भाविप प्रांत उपाध्यक्ष श्री.किशोर लुल्ला व श्री.शैलेंद्र तेलंग उपस्थित होते. माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.मंगला लोया व सचिव सौ.शकुंतला सखा यांनी संयोजन केले. पुण्याहून विकलांग पुनर्वसन केंद्रातर्फे श्री.मधुकर देवधर, श्री.पिंगळे व श्री.भडकमकर हे उपस्थित होते. एकूण ५० लाभार्थींनी नोंदणी केली. इचलकरंजी येथील विख्यात अस्थिरोगतज्ज्ञ डॉ.नेगांधी अध्यक्षस्थानी होते. महेश सेवा संघाच्या प्रशस्त हॉलमध्ये कार्यक्रम संपन्न झाला. 'अपंगांना सहकार्य केले म्हणजे फार मोठे काम केले अशा भावनेत राहू नये, तर आपण सर्व अवयव सुस्थितीत असतानाही त्यांचा वापर कसा व कुठल्या कामाकरता करतो याचा या निमित्ताने विचार करावा' असे आवाहन श्री.किशोर लुल्ला यांनी या प्रसंगी बोलताना केले. तिन्ही संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विचारमोती...

- ✱ विवेकानंदांना एकानं विचारलं, ''विष म्हणजे नेमकं काय?''
  विवेकानंद उत्तरले, ''आयुष्यात गरजेपेक्षा जास्त असतं ते विष...''
- ✱ आपल्याला मृत्यूची भीती वाटत असेल तर सर्वप्रथम या भीतीतून आपण स्वत:ची सुटका करावी. कारण या भीतीपायी आपण मुक्तपणे जगणे विसरतो शिवाय प्रत्येक कार्य करताना आपल्या संपूर्ण शक्तीचा वापर करावा.

# भारत विकास परिषद का २६ वा राष्ट्रीय अधिवेशन शुरू....

भारत विकास परिषद का ११ वा अंतरराष्ट्रीय २६ वा राष्ट्रीय अधिवेशन हुआ। अधिवेशन का आरंभ स्वामी माधव प्रसन्नाचार्य जी महाराज के उद्बोधन से हुआ। इस अवसर पर उन्होंने प्रतिनिधियों को संबोधित करते हुए कहा कि भारत विकास परिषद उन श्रेष्ठ कार्यकर्ताओं का संगठन है, जो स्वामी विवेकानंद जी, जिनके ज्ञान एवं व्यक्तित्व का लोहा अमेरिका जैसे सुपर पावर देश ने भी माना, ने संगठित किया। उनसे प्रेरणा लेकर और उन्हें आदर्श मानकर चल रहा है। उन्होंने कहा कि आज भी परिषद उनसे प्रेरणा लेकर और उन्हें आदर्श मानकर चल रही है। रवींद्र पाल शर्मा की अध्यक्षता में आरंभ हुए दो दिवसीय अधिवेशन में मुख्य अतिथि गीता मनीषी ज्ञानानंद जी महाराज थे। इसमें सभी स्थानों से लगभग २८५० प्रतिनिधि पधारे।

मंच पर कार्यकारी अध्यक्ष ईश्वर दत्त ओझा, राष्ट्रीय महामंत्र एस.के.वधवा, राष्ट्रीय संगठन मंत्री हरिश जिन्दल, राष्ट्रीय वित्त मंत्री डॉ.के.एल.गुप्ता, अधिवेशन चेयरमैन प्रो.एस.पी.तिवारी, अधिवेशन के सहसंयोजक अजय दत्ता, अधिवेशन स्वागताध्यक्ष डॉ.के.एल. पासी, अधिवेशन सचिव एच.आर.नारंग, अधिवेशन संयुक्तसचिव एस. सी. मलहोत्रा, अधिवेशन संयोजकराकेश सहगल, अधिवेशन सह-संयोजकके. एल. चौहान, अधिवेशन वित्त सचिव के.एम.एस.नांबियार एवं अधिवेशन संयुक्त वित्त सचिव श्री.जे. आर. टण्डन आदि उपस्थित थे।

राष्ट्रीय अध्यक्ष ने बताया कि स्वामीजी की १५० वी जयंती की तैयारियाँ जोरों के साथ पूरे देश में की जा रही है। स्वामीजी के जन्मशताब्दी वर्ष १९६३ में मातृभूमि की सेवा में समर्पित प्रबुद्ध नागरिकों ने एक विशिष्ट संगठन भारत विकास परिषद स्थापित किया था। यह सुखद संयोग ही है कि स्वामी विवेकानंद जी की १५० वी जयंती के साथ-साथ भारत विकास परिषद अपनी स्थापना की स्वर्णजयंती भी मना रहा है। उनका कहना था कि परिषद ने राष्ट्र व मानव सेवा का अनुकरणीय उदाहरण भी प्रस्तुत किया है। स्वामीजी ने परिषद में युवकों को लाने और उन्हें संस्कारित करने का संदेश दिया था।

इस अवसर पर मुख्य अतिथि स्वामी ज्ञानानंद जी ने भारत विकास परिषद के संस्थापक डॉ.सूरज प्रकाश की स्मृति में राष्ट्र ऋषि नानाजी देशमुख द्वारा स्थापित दीनदयाल शोध संस्थान को ग्रामीण विकास और उत्थान हेतु एक लाख रुपये की राशि भारत विकास परिषद उत्कृष्टता सम्मान के रूप में दी। इस वर्ष का यह सम्मान ग्राम विकास के क्षेत्र में उत्कृष्ट कार्य करने के लिए 'दीनदयाल शोध संस्थान को' दी गई, जिसे संस्थान के राष्ट्रीय सचिव डॉ.भारत शर्मा ने ग्रहण किया। स्वामी ज्ञानानंद जी ने इस अवसर पर मानव मूल्यों की चर्चा करते हुए बताया कि परिषद संपर्क, सहयोग, संस्कार, सेवा और समर्पण मूल मंत्र लेकर चला है जो हमारी संस्कृति के आधार है। उनका कहना था कि हमारे यहाँ तो कर्म को त्याग भाव से करने की प्रेरणा दी गयी है। उनका कहना था कि अब आवश्यकता है कि युवाओं में सेवा भाव जगाया जाये, उन्हें संयम और मर्यादा की प्रेरणा दी जाये ताकि देश में फैला भ्रष्टाचार समाप्त हो।

परिषद के राष्ट्रीय महासचिव एस.के.वधवा ने बताया कि सन १९६३ में दिल्ली में प्रारंभ एक शाखा से अब समस्त देश में परिषद की १२०० से अधिक शाखाएँ हैं। इसके लगभग एक लाख सदस्य नि:स्वार्थ भाव से सामाजिक सेवा के कार्यों में जुटे हुए हैं। उन्होंने बताया कि कार्य की दृष्टि से देश को १७ क्षेत्रों व ५७ प्रान्तों में बाँटा गया है। परिषद सेवा प्रकल्प के अंतर्गत संस्था ने सन १९९० में 'विकलांग सहायता एवं पुनर्वास योजना' को एक राष्ट्रीय प्रकल्प के रूप में प्रारंभ किया था। इस योजना के कार्यान्वयन के लिए आज समूचे देश में १३ विकलांग सहायता केंद्र एवं ९८ पुनर्वास केंद्र कार्य कर रहे हैं।

उनका कहना था कि इन विकलांग केंद्रों के माध्यम से प्रतिवर्ष लगभग २५ हजार विकलांग बंधुओं को कृत्रिम अंग नि:शुल्क प्रदान किये जाते है। उन्होंने बताया कि परिषद द्वारा राष्ट्रीय समूहगान प्रतियोगिता सर्वप्रथम वर्ष १९६७ में आयोजित की गई थी। इसमें प्रतिवर्ष भारत के सभी प्रांतो से लगभग ८० हजार से अधिक विद्यालयों के छात्र भाग लेते है। इस अवसर पर के.एल.गुप्ता ने बताया कि परिषद के आज तक ९२ विकास रत्न एक-एक लाख की राशि देकर बन चुके है। जिनकी राशि और उससे प्राप्त आय परिषद अपने नियमित कार्यों के अतिरिक्त राष्ट्रीय आपदाओं में सदैव आगे बढ कर भाग लेती है। जैसे भूकंप, कारगिल युद्ध, उडीसा में विनाशकारी साइक्लोन, राजस्थान में सूखा व असम एवं बिहार में बाढपिडितों की सहायता के लिए धन।


**प्रशिक्षित मार्गदर्शकाबरोबर रायगडदर्शन**
**शिवतीर्थ रायगड ही स्फूर्तीदायी चित्रफीत**
**शिवकालीन दस्तावेज आणि शस्त्रास्त्रांचे संग्रहालय**
**या सर्व सोयी रोपवेच्या तिकीटातच उपलब्ध**



**एकदिवसीय सहलीसाठी सर्वोत्तम!**

**Millennium Properties Pvt. Ltd.**

पुणे : (020) 25459730 / 25459731 रायगड रोप-वे (02145)274831

**उत्तम निवास व भोजनाची सुविधा**

Apr. 2012



## भारत - विकास

भारत विकास परिषद - महाराष्ट्र प्रांत II करिता संपर्क
- शैलेंद्र तेलंग, सदर्न , मेन रोड, बालाजी चौक, सांगली ४१६ ४१६
ई-मेल : bvpmaha2varta@gmail.com

*महाराष्ट्र प्रांत II या प्रांतातील सर्व सदस्य, इतर संस्था-संघटनांतील पदाधिकारी, तसेच राज्यभरातील प्रतिष्ठित मान्यवरांकडे पोचणारे* **नियतकालिक.**

**दरमहा प्रकाशित होणाऱ्या**

या योजनेस जाहिरातरूपाने आर्थिक सहकार्य द्यावे अशी विनंती आहे.

**पृष्ठांचा आकार २५ x ३७ सेंमी (टॅब्लॉईड आकार)**

पूर्ण पान- रु. ६०००/-(२२ X ३३ सेंमी), अर्धे पान - रु.३०००/-
पाव पान - रु. १५००/- अष्टमांश पान - रु. ५००/-
शुभेच्छा - रु. २००/-

**श्री.उमेश राठी** प्रांत अध्यक्ष (98220 58209)
**श्री.राजेंद्र जोग** प्रांत सचिव (97666 27131)
**सौ. विनिता तेलंग** संपादन (98909 28411)

***टीप : जाहिरातींच्या १५% रक्कम कमिशन देणेत येईल.***
* *आपल्या जाहिरातीचा मजकूर, आर्टपूल किंवा सीडी पाठवावी.*
* *चेक/ड्राफ्ट सांगली शाखेवरील कोणत्याही बँकेचा 'भारत विकास परिषद' या नावाने द्यावा.*


हा अंक पाहण्यासाठी वेबसाईट : www.bvpindia.com / ebooks_states.html

ई-मेल : bvpmaha2varta@gmail.com


कार्यकारी संपादक : वसंत आपटे
व्यवस्थापक : विनायक साठे
मुद्रण व प्रकाशनस्थळ : वाल्मिकी, किर्लोस्करवाडी
अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
रजिस्टार ऑफ न्यूजपेपर्स (दिल्ली) रजि. नं. ३५७१५/७९
डिक्लरेशन नं. Home-1/Desk-6/MAG/SR/447

**आपले जग**
**Aple Jag Kirloskarwadi 416 308-02**
Dist. Sangli- Maharashtra. **Dial : 02346 -222058 / 223558**
**E-Mail : aapalejag@gmail.com**
**Posted on Monday** **BVP-0912012**

Postal regn. No.
CR/RNP /SAN/9-2009-2011